8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मराठा क्रांती मोर्चाचा जाहीर पाठिंबा

## राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी

**मुंबई/जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला मराठा क्रांती मोर्चा आणि सकळ मराठा समाज महाराष्ट्र यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यासोबतच मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन आदेशाच्या मूळ शब्दरचनेत बदल करून मराठा समाजाला अपेक्षित लाभ मिळणार नाही, अशी कार्यपद्धती तयार करण्यात आली. त्यामुळे पात्र मराठा बांधवांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग अधिक गुंतागुंतीचा झाला असून शासनाने जाहीर केलेली कार्यप्रणाली प्रभावीपणे राबविण्यात अपयश आल्याचा आरोप त्यांनी केला.

**"जरांगे यांच्या आंदोलनाची फसवणूक झाली"**

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मनोज जरांगे पाटील



यांनी आझाद मैदान येथे केलेल्या आंदोलनानंतर शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे चित्र निर्माण केले. मात्र प्रत्यक्षात हैदराबाद गॅझेटनुसार मोठ्या प्रमाणावर प्रमाणपत्रे मिळण्याची अपेक्षा पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आंदोलनकर्त्यांची आणि संपूर्ण मराठा समाजाची फसवणूक झाल्याचा आरोप मराठा क्रांती मोर्चाने केला आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून त्यांच्या आंदोलनाला संघटनेचा पूर्ण पाठिंबा असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी स्पष्ट केले. **विखे पाटील यांच्यावर निष्क्रियतेचा आरोप**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि न्याय्य मागण्यांबाबत सरकारने अपेक्षित गांभीर्य दाखविले नसल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. विशेषतः राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षण विषयक प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ती सक्रियता दाखविली नसल्याचा दावा संघटनेने केला आहे.

मराठा समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्याऐवजी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले असून प्रश्नांच्या सोडवणुकीपासून जाणीवपूर्वक पळ काढला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**"मराठा-ओबीसी वाद वाढविला जात आहे"**

निवेदनात मराठा समाजाला आरक्षण दिल्याचा दावा करून प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे सांगण्यात आले आहे. काही राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मराठा आणि *(पान २ वर)*

## जालना समृद्धी महामार्गावर मराठा समाजाचा एल्गार, वाहतूक काही काळ ठप्प

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासह समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे भर उन्हात आमरण उपोषणाला सुरुवात केली. त्यांच्या या निर्णयानंतर राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा एकदा तापले असून जालना जिल्ह्यासह राज्यभरात मराठा समाज आक्रमक झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मराठा समाजाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर उतरून रस्ता रोको आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांनी महामार्गावर ठिय्या देत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.


"आरक्षण आमचा हक्क आहे", "शासन जागे व्हा", "मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या तात्काळ मान्य करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली. रस्ता रोको आंदोलनामुळे समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. प्रवासी, मालवाहतूक वाहने आणि खासगी वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती. आंदोलनकर्त्यांनी शासनाला कडक शब्दांत इशारा देताना सांगितले की, उपोषणादरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीला काहीही बरे-वाईट झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारची राहील. त्याचे तीव्र आणि व्यापक पडसाद महाराष्ट्रभर उमटतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## जालना शहरात दोन दिवस अहिल्यादेवी होळकर बहुजन व्याख्यानमाला!

### गुरुवारी ना.राम शिंदे, खा.रामराव वडकुते यांची राहणार उपस्थिती

**दत्ता देशमुख**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त प्रतीवर्षाप्रमाणे सुरू असलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुजन व्याख्यानमाला यंदाही आयोजित करण्यात आली असून गुरुवारी ( ता. ०४) सायं. ०६.३० वा. टाऊन हॉल स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विधान परिषदेचे सभापती ना.राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार असल्याची माहिती व्याख्यानमालेचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर ,सचिव सुनंदा बनसोडे यांनी दिली. व्याख्यानमालेचे यंदा १२ वे वर्षे असून जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गुरुवारी होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यात अध्यक्षस्थानी ना.राम शिंदे हे " मी कसा घडलो" या विषयावर मार्गदर्शन करतील.याप्रसंगी खा.रामराव वडकुते, आरक्षण यौध्दा दीपक बोऱ्हाडे यांचा विशेष सत्कार केला जाणार असून महापौर वंदनाताई मगरे ,उपमहापौर राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.यावेळी होळकरशाही चे अभ्यासक , संशोधक राम लांडे लिखित " लाईफ ॲन्ड लाईफ्स ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन होईल. शुक्रवारी ( ता. ०५) आ.अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या पुष्पात अहिल्यानगर येथील ज्येष्ठ लेखक, विचारवंत लहुजी कानडे हे " अहिल्यादेवी होळकर यांचे महिला विषयक धोरण व महिला आरक्षण कायदा निर्मिती सद्यस्थितीतील यश अपयश "या विषयावर मार्गदर्शन करतील. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी, लातूरच्या जि. प .सदस्य शितल खोमणे यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे .प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक नारायण दादा चाळगे हे राहतील. तरी अहिल्यादेवी होळकर प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा असे आवाहन व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर ,सचिव सुनंदा बनसोडे, उपाध्यक्ष सुरेखा गाडेकर ,कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे *(पान २ वर)*



# संपादकीय...

## जालन्याची स्वच्छता धोक्यात; प्रशासन जागे होणार कधी?

जालना शहरातील तुंबलेले नाले, रस्त्यांवरील कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याची समस्या आणि वाढती अस्वच्छता हा आता केवळ नागरी सुविधांचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो थेट सार्वजनिक आरोग्य, प्रशासनाची कार्यक्षमता आणि लोकप्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाशी जोडलेला गंभीर विषय बनला आहे. पावसाळा तोंडावर असताना शहरातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती पाहता, प्रशासनाने वेळेत उपाययोजना केल्या नसल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे.

घायाळ नगरमधील मोठा नाला असो, स्टेशन रोड परिसरातील कचऱ्याचे ढीग असोत किंवा संग्राम नगरमधील सांडपाण्याची समस्या असो, शहरातील प्रत्येक भागातून एकच तक्रार ऐकू येत आहे''मनपा प्रशासन आमच्या समस्यांकडे लक्ष देत नाही.'' नागरिकांचा हा आक्रोश केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून प्रत्यक्ष परिस्थितीचे प्रतिबिंब आहे.

**पावसाळ्यापूर्वीची तयारी कागदावरच?**

प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटारांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पूरनियंत्रण याबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. लाखो रुपयांची तरतूद केली जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक नाले गाळाने आणि कचऱ्याने भरलेले दिसतात. परिणामी पहिल्याच पावसात रस्ते जलमय होतात, घरे आणि दुकाने पाण्याखाली जातात आणि नागरिकांना मोठा फटका बसतो.

यंदाही त्याच दिशेने परिस्थिती जात असल्याचे चित्र दिसत आहे. घायाळ नगर, संग्राम नगर, स्टेशन रोड, नूतन वसाहत आणि इतर अनेक भागांत नाले अद्याप साफ झाले नसल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे प्रशासनाच्या पूर्वतयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**स्वच्छता ही केवळ मनपाचीच जबाबदारी नाही**

महानगरपालिकेवर टीका होत असली तरी शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची नाही. नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, नाल्यांमध्ये प्लास्टिक आणि घनकचरा फेकणे, तसेच चिकन-मटण विक्रेत्यांकडून उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या टाकाऊ पदार्थांबाबत सजग राहणे आवश्यक आहे.

मात्र याचा अर्थ प्रशासनाची जबाबदारी कमी होत नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे, नियमित स्वच्छता करणे आणि कचरा व्यवस्थापनाची प्रभावी यंत्रणा उभी करणे हे प्रशासनाचे कर्तव्यच आहे.

**आंदोलन हे अपयशाचे लक्षण**

संग्राम नगरमध्ये नागरिकांनी रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करणे, ही बाब प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहे. लोकांना त्यांच्या मूलभूत समस्यांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असेल, तर याचा अर्थ संवाद आणि समस्या निवारण यंत्रणा कुठेतरी अपयशी ठरत आहे.

विशेषतः महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग हे दर्शविते की, अस्वच्छतेचा आणि सांडपाण्याचा प्रश्न आता दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करू लागला आहे.

**आरोग्याचा वाढता धोका**

तुंबलेले नाले आणि साचलेले पाणी हे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया आणि गॅस्ट्रोसारख्या साथीच्या रोगांना आमंत्रण देणारे ठरतात. कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न हा केवळ सौंदर्यीकरणाचा विषय नसून सार्वजनिक आरोग्याचा मूलभूत प्रश्न आहे.

जर पावसाळ्यापूर्वी व्यापक स्वच्छता मोहीम राबवली नाही, तर आगामी काही महिन्यांत शहराला आरोग्यविषयक मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो.

शहरातील नागरिकांचा रोष केवळ स्वच्छता विभागापुरता मर्यादित राहिलेला नाही. आता लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी आणि प्रशासनाच्या एकूण कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांच्या तक्रारींची वेळेत दखल घेतली असती, तर आंदोलनाची वेळ आली नसती.

यामुळे लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने देण्यापेक्षा प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेऊन समस्यांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वरिष्ठ प्रशासनानेही कामकाजाचा आढावा घेऊन निष्क्रियतेबाबत जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

**विभागीय आयुक्तांनी हस्तक्षेप करण्याची वेळ**

शहरातील परिस्थिती पाहता, आता विभागीय आयुक्तांनी स्वतः या प्रश्नात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे. मनपा प्रशासनाची विशेष बैठक घेऊन नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्याच्या उपाययोजनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

जालना हे वेगाने वाढणारे शहर आहे. अशा शहराची ओळख कचऱ्याचे ढीग आणि तुंबलेल्या नाल्यांनी नव्हे, तर सुयोग्य नागरी व्यवस्थापनाने व्हायला हवी. स्वच्छता ही सुविधा नसून नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्या हक्काची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाने तातडीने युद्धपातळीवर काम करणे, हीच काळाची गरज आहे.

# राजकीय घराणेशाहीची 'सदाबहार' परंपरा...!!

..महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागताच राजकीय घराणेशाहीला आलेला ऊत हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू आणणारा आहे. वर्षानुवर्षे पक्षाची प्रामाणिकपणे सेवा केल्यानंतरही निवडणुकीत जेव्हा तिकीट देण्याची वेळ येते तेव्हा प्रत्येकवेळी निष्ठावंत कार्यकर्त्यांऐवजी राजकीय नेत्यांकडून आपल्या कुटुंबातील सदस्यालाच पुढे आणले जाते. राजकीय घराणेशाहीची ही सदाबहार परंपरा जर अशीच सुरू राहिली तर ती लोकशाहीसाठी मारक ठरू शकते. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण सर्वांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. विविध संस्थाने भारतात विलीन होताच राजेशाहीचा आपल्या देशातून अस्त झाला. परंतु, असे असले तरी नंतरच्या काळात मात्र लोकशाही अस्तित्वात असतानाही राजकीय नेत्यांनी विविध निवडणुकांमधून आपल्या कुटुंबातील सदस्यांना तिकिटे देत घराणेशाहीला खतपाणी घातले. केवळ निवडणुकांची तिकिटेच नाही तर विविध महत्त्वाच्या पदांसाठीही नेत्यांकडून आपल्या नातेवाईकांची वर्णी लावली जाते. नेत्यांचे नातेवाईक राजकारणात वर्षानुवर्षे ठिय्या देऊन बसत असतील, तर खरेच ही लोकशाही आहे का असा प्रश्न पडतो. जनतेची सेवा करण्यासाठी असणारी पदे राजकीय घराणेशाहीमुळे वर्षानुवर्षे जर एकच कुटुंब उपभोगत असेल तर हीदेखील एकप्रकारची राजेशाहीच नाही का? देशात विविध ठिकाणी राजकीय घराणेशाहीचे वाढलेले प्रमाण एकदिवस लोकशाहीला संपविल्याशिवाय राहणार नाही. विधान परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच अनेक प्रस्थापित नेत्यांनी आपल्या मुलांना तिकीट मिळावे, यासाठी मोठी धडपड सुरू केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे आपला मुलगा अनिकेत तटकरेंसाठी, मंत्री भरत गोगावले आपला मुलगा विकास गोगावलेंसाठी, बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर आपला मुलगा क्षितिज ठाकुरांसाठी, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे हे आपली कन्या रोहिणी खडसेंसाठी, काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार आपली मुलगी शिवानी वडेट्टीवार यांच्यासाठी, सोलापुरातील राजकारणातील बडे प्रस्थ असलेले विजयसिंह मोहिते-पाटील हे आपले पुत्र रणजितसिंह मोहिते-पाटील यांना तिकीट मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आपल्या जकीय नेत्यांकडून कौटुंबिक सदस्यांसाठी मोर्चेबांधणी सुरू होताच सर्वसामान्य कार्यकर्त्यांकडे डोळे पुसल्याशिवाय काही पर्याय राहिलेला नाही. आपल्या मुलांना तिकीट मिळवण्याच्या धामधुमीत कार्यकर्त्यांच्या डोळ्यातील अश्रूही अनेक राजकीय नेत्यांना दिसेनासे झाले आहेत किंवा त्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केले जात आहे. कार्यकर्त्यांना केवळ सतरंज्या उचलण्यापुरतेच मर्यादित ठेवले जात



आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांच्या लाठ्या-काठ्या खाण्याची वेळ येते, तेव्हा त्यांना पुढे केले जाते.

प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांसोबत दोन हात करण्याची वेळ आल्यावर कार्यकर्ता आठवतो. निवडणुकीच्या प्रचाराची वेळ आली की, कार्यकर्त्यांशिवाय पुढे जात नाही. दारोदार प्रचाराची पत्रके वाटण्याची वेळ आली तर त्याचेही ओझे कार्यकर्त्यांनीच उचलायचे. सर्व सेवा करायची कार्यकर्त्यांनी, तिकिटांचा मेवा खायचा मात्र नेत्यांच्या मुलांनी, असे आणखी किती दिवस चालणार? लोकशाहीत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पक्षाचा कणा मानला जातो. पण, जेव्हा सत्तेची पदे देण्याची वेळ येते, तेव्हा मात्र हा कणा बाजूला सारून नेत्यांच्या घरातील मंडळींना प्राधान्य दिले जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात घराणेशाही नवीन नाही. विधानसभा असो, लोकसभा असो की स्थानिक स्वराज्य संस्था, विविध घराण्यांचे वर्चस्व तिथे पिढ्यानपिढ्या पाहायला मिळते. लोकप्रतिनिधींच्या निवडणुकीत जनतेला थेट आपला नेता निवडण्याचा अधिकार असतो. तिथे घराणेशाही असली तरी जनतेच्या दरबारात कौल घेण्याचे आव्हान असते. विधान परिषदेचे गणित मात्र वेगळे आहे. येथे आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सदस्य निवडून देतात किंवा अनेकदा थेट पक्षाचे हायकमांड कोणाला तिकीट द्यायचे हे ठरवतात. त्यामुळे जनतेच्या दरबारात थेट परीक्षा न देता, केवळ कौटुंबिक संबंधांच्या जोरावर विधिमंडळाचे तिकीट मिळवणे नेत्यांच्या मुलांना किंवा नातेवाईकांना अधिक सोपे जाते. या घराणेशाहीमुळे विधान परिषदेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. घटनाकारांनी विधान परिषदेची रचना करताना अशी अपेक्षा ठेवली होती की, ज्या व्यक्ती थेट निवडणुकीच्या राजकारणात पडू शकत नाहीत, पण ज्यांच्याकडे ज्ञान, अनुभव आणि समाजाला दिशा देण्याची क्षमता आहे, अशांना संधी देण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली होती. उदा. शिक्षक, पदवीधर, साहित्यिक, शास्त्रज्ञ किंवा ज्येष्ठ समाजसेवक अशा व्यक्तींना या सभागृहात स्थान मिळावे, यासाठी ही विधान परिषद होती. परंतु, आजचे चित्र पाहिले तर असे जाणवते की, फोडाफोडीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी, राजकीय पक्षातील वजन आणि नेत्यांशी असलेले रक्ताचे नाते हीच विधान परिषदेत जाण्याची प्रमुख पात्रता बनली आहे. विधान परिषद राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांचे पुनर्वसन केंद्र किंवा घराण्यातील वारसांचे राजकीय लाँचिंग पॅड बनत चालली आहे. घराणेशाहीचा मुद्दा येताच नेत्यांच्या वारसांना राजकारणात येण्याचा अधिकार नाही का? असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. डॉक्टरचा मुलगा डॉक्टर आणि वकिलाचा मुलगा वकील होऊ शकतो, मग नेत्याचा मुलगा नेता का नाही? हा प्रश्न वरकरणी योग्य वाटत असला तरी इतर क्षेत्रांत वारसाला स्वतःची पात्रता आणि कुवत सिद्ध करावी लागते. नेत्यांच्या मुलाला मात्र वडिलांच्या पुण्याईमुळे थेट पक्षाचे सर्वात मोठे तिकीट मिळते. जिथे गुणवत्तेपेक्षा रक्ताच्या नात्याला अधिक महत्त्व आहे. जोपर्यंत राजकीय पक्ष या घराणेशाहीच्या विळख्यातून बाहेर पडत नाहीत, तोपर्यंत लोकशाही खऱ्या अर्थाने प्रगल्भ होणार नाही. पक्षांनी आता तरी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. नेत्यांच्या घरापलीकडे जाऊन, जमिनीवर काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना आणि समाजातील खऱ्या सुजाण तज्ज्ञांना विधिमंडळात पाठवायला हवे. अन्यथा, विधान परिषद ही केवळ नेत्यांच्या नातलगांची परिषद म्हणून उपहासली जाईल. लोकशाहीवरील जनतेचा विश्वास आणखी कमी होईल.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### वाचकांचे मनोगत करिता

रस्त्यावरील अपघातांची संख्या कमी होण्याची शक्यता नाही.रस्ते शहरातील असोत की ग्रामीण. रस्ता बनवण्याचे बांधकाम कंत्राट काही अब्जावधी रुपयांची असतात.मुंबई शहरातील रस्ते बांधकामांचे कंत्राट काही वर्षांपूर्वी अब्जावधी रुपयाचे होते.आता तर रस्ता बनवण्याचे सल्लागार नेमण्यात येतात.खरंच, सल्लागार कंपन्यांची गरज आहे का? रस्ते बांधकामांचे तज्ज्ञ अभियंता हे नेमके काय काम करतात.रस्ते बनवल्यानंतर दोन वर्षांत उख डायला सुरूवात होते.तंत्रज्ञान एवढे टिकाऊ झाले आहे काय ? की बांधकामात टक्केवारी वाढली? कंत्राटदारांना रस्त्याचे कंत्राट मिळवण्यासाठी रुपयातील ६० पैसे खिरापत वाटण्यात जात असतील तर ४० पैशात बांधकाम खर्च आणि आपल्या कामगारांचा पगार कसा भागवणार ? कसे दर्जेदार रस्ते नागरिकांना मिळणार ? रस्त्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाते.रस्त्यांसाठी दरवर्षी राज्याचे काही हजार कोटी रुपये खर्च होतात.नवे महामार्ग, द्रुतगती महामार्ग,रस्त्यांचे रुंदीकरण, सरळीकरण, सपाटीकरण,मजबूती करण अशी असंख्य कामे सुरू आहेत.ग्रामीण भागातील रस्ते उखडले गेले आहेत.म्हणून रिक्षावाले प्रवाशांची अडवणूक करून वाटेल ते भाडे प्रवाशांकडून घेतात.उप प्रादेशिक परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना अधिकची भाडे वसूली का केली जाते हे विचारायला वेळ नाही ? महाराष्ट्रात रस्ते अपघातात किमान पन्नास एक जीव जातात.रस्ते सुरक्षा इतकी वाऱ्यावर का आहे.कंत्राट निविदा प्रक्रिया सुरू असताना रस्ते बांधकामांचे कंत्राटदार किती आहेत.निविदा कोणाला मिळेल याचे अंदाज वर्तविण्यात येतात.निकृष्ट दर्जाच्या रस्ते बांधकामांच्या त्रुटी सामान्य नागरिकांना समजतात तर त्या अभियंत्यांना का समजून येते नाहीत की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते? रस्त्यावरील खड्डे रस्ते अपघाताचे मुख्य कारण आहे.रस्त्यांचे परिरक्षण होते की नाही हे पाहण्यासाठी सक्षम यंत्रणा नाही.रस्त्यावरील गतीरोधकांना पांढरे पिवळे पट्टे नाहीत.

# पान १ व ४ वरुन....

### मनोज जरांगे पाटील...

ओबीसी समाजामध्ये वाद निर्माण होईल, अशा प्रकारचे वातावरण तयार केले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने स्पष्ट आणि ठोस भूमिका घेण्याची गरज असून समाजात निर्माण होणारा तणाव टाळण्यासाठी तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी हस्तक्षेप करावा**

राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदाचा तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाने केली आहे. तसे न झाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी आग्रही मागणी संघटनेने केली आहे.

हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन आदेश अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरल्याचा दावा करत हा आदेश प्रभावी नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने सुधारित कार्यपद्धती जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**आंदोलनाकडे राज्याचे लक्ष**

अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा राज्याच्या राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. विविध मराठा संघटनांकडून आंदोलनाला पाठिंबा वाढत असून सरकार आणि आंदोलनकर्त्यांमधील चर्चेतून कोणता मार्ग निघतो, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

सहसचिव सरिता तरवटे ,सदस्य संतोष लव्हटे, सौरभ भिसे यांच्यासह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**_ आज अभिवादन सोहळा..!**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला समितीच्या वतीने रविवारी ( ता.३१) सकाळी ०९.३० वा. अंबड चौफुली जवळील नियोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाजवळ अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर, सचिव सुनंदा बनसोडे, उपाध्यक्ष सुरेखा गाडेकर, कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे, सहसचिव सरिता तरवटे ,सदस्य संतोष लव्हटे ,सौरभ भिसे यांच्यासह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### _ जालना शहरात...

सहसचिव सरिता तरवटे ,सदस्य संतोष लव्हटे, सौरभ भिसे यांच्यासह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**_ आज अभिवादन सोहळा..!**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला समितीच्या वतीने रविवारी ( ता.३१) सकाळी ०९.३० वा. अंबड चौफुली जवळील नियोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाजवळ अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर, सचिव सुनंदा बनसोडे, उपाध्यक्ष सुरेखा गाडेकर, कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे, सहसचिव सरिता तरवटे ,सदस्य संतोष लव्हटे ,सौरभ भिसे यांच्यासह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### _ जालन्यातून चोरीला...

विविध तांत्रिक बाबींचा अभ्यास करत तपास सुरू केला. तपासादरम्यान गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे दगडू अशोक कोरडे आणि नारायण आसाराम धोत्रे, दोघेही रा. मुर्ती, ता. घनसावंगी, जि. जालना यांनी ट्रक चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

**घनसावंगी येथे सापळा; आरोपी ताब्यात**

माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घनसावंगी तालुक्यात सापळा रचून चोरीचा ट्रक अडविला. कारवाईदरम्यान दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला १२ लाख रुपये किंमतीचा टाटा ट्रक जप्त करण्यात आला. पोलिसांनी दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले असून अधिक तपास सुरू आहे.

**आरोपींची नावे**

दगडू अशोक कोरडे (वय ३३), व्यवसाय चालक, रा. मुर्ती, ता. घनसावंगी, जि. जालना, नारायण आसाराम धोत्रे (वय २४), व्यवसाय चालक, रा. मुर्ती, ता. घनसावंगी, जि. जालना.

**१२ लाखांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत पोलिसांनी रु. १२,००,००० किंमतीचा टाटा कंपनीचा ट्रक (MH-11-DD-3577) जप्त करून मालकास दिलासा दिला आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे, सतीश श्रीवास, भागवत खरात, कैलास चेके आणि अशोक जाधव यांनी सहभाग घेतला.

### श्रीमद् भगवद्गीतेचा...

ते सत्य आधीच सापडलेले आहे; म्हणूनच विज्ञान ही अध्यात्माचीच एक शाखा आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी तीर्थरूप आईसाहेब साखरे, ह. भ. प. नाना महाराज पोखरीकर, ह. भ. प. प्रकाशराव वाघमारे महाराज, ह. भ. प. प्रभाकर महाराज सुरासे, ह. भ. प. भगवान महाराज कचरे, ह. भ. प. निखिल महाराज चक्रवार आळंदी, ह. भ. प. भास्कर महाराज तांबे आळंदी, ह. भ. प. रामकिसन मंत्री, ह. भ. प. ऋषिकेश राजे जाधव महाराज आळंदी, ह. भ. प. किशोर महाराज जिगे, ह. भ. प. मुक्तानंद महाराज कांबे, ह. भ. प. पांडुरंग महाराज वाघमारे, ह. भ. प. बाबुराव व्यवहारे, ह. भ. प. सोपान महाराज दुसाने, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उद्योजक संजय राठी, ॲड. सतीश तवरावाला, प्रा. डॉ. यशवंत सोनुने आदींची प्रमुख उपस्थिती होती. आणखी दोन दिवस चालणाऱ्या या भव्य आणि अलौकिक ज्ञानयज्ञाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन जेईएस महाविद्यालय आणि श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सत्संग मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# बनावट आयुर्वेदिक औषधे आणि बोगस उपचार केंद्रांचा वाढता विळखा : जनतेच्या आरोग्याशी सुरु असलेला जीवघेणा खेळ

राज्यात बनावट आयुर्वेदिक औषधांचा काळाबाजार आणि बोगस उपचार केंद्रांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. अनेक ठिकाणी परवानगीशिवाय आयुर्वेदिक उपचार केंद्रे चालवले जात आहेत,तर काही ठिकाणी खोट्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक केली जात आहे.नुकतीच राज्यभरातील सात जिल्ह्यांमध्ये १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर धडक कारवाई करून तब्बल ७३ लाख २४ हजार ६५६ रुपयांचा मिसब्रँडेड व आक्षेपार्ह जाहिराती असलेला औषधसाठा अन्न व औषध प्रशासन विभागाकडून जप्त करण्यात आला.या कारवाईमुळे राज्यातील बनावट औषध व्यवसायाचे गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की,जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही.भ्रामक जाहिराती,अवैध औषध उत्पादन आणि बेकायदेशीर विक्रीविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण केली जाईल.प्रशासनाची ही भूमिका महत्त्वाची असली तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण आणि शहरी भागात ही अजूनही बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रे खुलेआम सुरू असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.विशेष म्हणजे आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरातही बनावट आयुर्वेदिक उपचार केंद्रांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असल्याचे अनेकदा समोर आले आहे.मुंबई शहर आणि उपनगराच्या अनेक भागांमध्ये तसेच गर्दीच्या बाजारपेठांमध्ये अनेक तथाकथित आयुर्वेदिक उपचार केंद्रे दवाखाने लोकांना ''हमीशीर उपचार'' देण्याच्या नावाखाली लुटत आहेत.काही केंद्रांवर कोणतीही वैद्यकीय पदवी नसलेले लोक स्वतःला डॉक्टर किंवा वैद्य म्हणून सादर करतात.मोठमोठे बॅनर,सोशल मीडियावरील जाहिराती आणि व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ''कॅन्सर पूर्ण बरा'', ''मधुमेह कायमचा नष्ट'', ''किडनी विकारावर खात्रीशीर उपाय'', ''गुडघे दुःखीपासून कायमची मुक्तता'', ''लठ्ठपणा ७ दिवसांत कमी'' अशा प्रकारच्या भ्रामक जाहिराती करून लोकांना जाळ्यात ओढत




आहेत.गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक हे कमी खर्चात उपचार मिळतील या आशेने अनेक जण अशा आयुर्वेदिक उपचार केंद्रांकडे वळतात.मात्र प्रत्यक्षात त्यांच्याकडून हजारो,लाखो रुपये उकळले जातात.काही वेळा चुकीची बनावट औषधे दिल्यामुळे रुग्णांची प्रकृती आणखी बिघडते.अनेकांना गंभीर दुष्परिणामांना सामोरे जावे लागते.काही प्रकरणांमध्ये तर वेळेवर योग्य उपचार न मिळाल्याने रुग्णांचा जीव धोक्यात आल्याच्या घटनाही घडल्या आहेत.आजकाल सोशल मीडिया हे या बोगस व्यवसायाचे सर्वात मोठे माध्यम बनले आहे.फेसबुक,यूट्यूब,इंस्टाग्राम आणि विविध वेबसाईट्सवर आकर्षक व्हिडीओ व बनावट अनुभव दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला जातो.काही जण खोटे रुग्ण उभे करून ''आम्ही पूर्ण बरे झालो'' अशा प्रतिक्रिया दाखवतात.यामुळे सर्वसामान्य लोक सहजपणे फसतात.विशेषतः गंभीर आजारांनी त्रस्त असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था लक्षात घेऊन त्यांची फसवणूक केली जाते.राज्यातील अनेक बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रांमध्ये औषधांची कोणतीही गुणवत्ता तपासणी होत नाही.उत्पादन कुठे तयार झाले,त्यात कोणते घटक आहेत,त्याचा शरीरावर काय परिणाम होईल याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसते.काही ठिकाणी तर बनावट लेबल लावून औषधे विकली जातात.अशा औषधांमुळे यकृत,मूत्रपिंड आणि हृदयाशी संबंधित गंभीर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते.या वाढत्या प्रकारांमुळे केवळ आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही,तर खऱ्या आयुर्वेद शास्त्राची प्रतिमाही मलिन होत आहे.आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि प्रभावी उपचार पद्धती मानली जाते.मात्र काही बोगस लोकांच्या गैरप्रकारांमुळे संपूर्ण आयुर्वेद व्यवस्थेबद्दल समाजात संशय निर्माण होत आहे.त्यामुळे अशा फसव्या आयुर्वेदिक व्यवसायांवर कठोर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.प्रशासनाने केवळ अधूनमधून कारवाई करून थांबता



कामा नये. नियमित तपासण्या,परवाना पडताळणी,ऑनलाईन जाहिरातींवर नियंत्रण आणि बोगस आयुर्वेदिक दवाखान्यांवर तातडीने गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.तसेच नागरिकांनीही जागरूक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.कोणत्याही आयुर्वेदिक डॉक्टरकडे उपचार घेण्यापूर्वी त्यांची अधिकृत नोंदणी,वैद्यकीय पात्रता आणि औषधांचा परवाना तपासणे गरजेचे आहे.संशयास्पद जाहिराती आणि अवैध उपचार केंद्रांची माहिती प्रशासनाला देणे ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी आहे.

जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बनावट औषध माफियांना वेळीच आळा घातला नाही तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.त्यामुळे सरकार,अन्न व औषध प्रशासन,आरोग्य विभाग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे या बोगस साखळीविरोधात लढा उभारणे ही काळाची गरज बनली आहे.

**- केतन दत्ताराम भोज**
**घाटकोपर**
**सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई**

# राबता वेल्फेअर अँड सोशल ग्रुप जालनाच्या वतीने मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**जालना- प्रतिनिधी**

जालना राबता वेल्फेअर अँड सोशल ग्रुप जालना च्या वतीने ३१ मे २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता मुस्लिम सामूहिक विवाह सोहळा होणार आहे या विवाह सोहळ्यात ११ जोडपे विवाहबद्ध होणार आहे राबता ग्रुप च्या तर्फे या जोडप्यांना कपडे पलंग बिस्तर आणि संसार उपयोगी वस्तू भेट देणार आहे

हा कार्यक्रम शहरातील आयशा लॉन येथे रविवार ३१ मे रोजी साडेदहा वाजता मौलाना हुजैफा वस्तानवी, मौलाना मुफ्ती अब्दुल रहमान, काझी ए शरीअत जालना आणि जिल्ह्याचे खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुनराव खोतकर, एम एम शेख माजी आमदार, कैलास गोरंट्याल माजी आमदार जालना या विवाह सोहळ्याचे उद्घाटक म्हणून श्रीमती आशिमा मित्तल जिल्हाधिकारी जालना, प्रमुख उपस्थिती जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू

यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून इकबाल पाशा, दिलीप अर्जुने,अब्दुल रशीद पहेलवान, इलियास याकूब, सादत अली खान, कल्याणराव दळे, नदीम सय्यद, अब्दुल हफिज( पत्रकार) इमरान खान, अब्दुल हफिस उद्योजक, शेख सगीर पहिलवान नगरसेवक, बदर चाऊस,विखार खान, मोहन इंगळे, सुलतान खान, शेख अफसर शेख जी अध्यक्ष राहत ग्रुप, फकखरूल्ला खान,सय्यद रहीम नगरसेवक, सुभाष चंद्र कटारिया, आसिफ अन्सारी नगरसेवक, शेख रियाज,इमरान खान लाला, अमजद खान पठाण, माजेद खान नगरसेवक, सुजित कुमार जोगस, विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे

विवाह सोहळा समिती संस्थापक अध्यक्ष सलीम यासीन खान पठाण उपाध्यक्ष शेरजमाखान कोषाध्यक्ष एडवोकेट शहबाज खान पठाण

सचिव अनस चाऊस कार्याध्यक्ष जावेद पठाण सहसचिव एडवोकेट अश्फाक पठाण सदस्य - अमीर शेर खान अमजद खान, जफर खान, सय्यद लतीफ,इमरान मनियार, कलीम खान पठाण, सय्यद करीम बिल्डर, हाजी बाबा भाई आमेर पाशा खान, अजिज पठाण,अतिक खान, सय्यद एजाज, डॉक्टर अजीम, डॉक्टर सय्यद अख्तर,अर्शद मिर्झा, अमजद पठाण, सलीम भाई, शेख मेहबूब, सय्यद शाकीर,साईद जागीरदार प्रमुख अतिथी म्हणून मुफ्ती गुलाम नबी परसुवाले, मुफ्ती मोहम्मद सहाब, सुभाष गिराम सरपंच, सय्यद मुजाहिद, सय्यद अमिर,रियाज सौदागर,कलीम खान, फैसल चाऊस,फिरोज खान, मुजीब साहब,अजीम केके, सय्यद मुखतार,सय्यद बक्षी, शेख नजीब, शेख मुजीब, डॉक्टर वाहिद काझी, शेख खैरूभाई, सय्यद अहमद, नगरसेवक फारूक तुंडीवाले सय्यद नदिम,सय्यद शमशु,शेख सिकंदर, शेख गुड्डू भाई, विष्णुपंत गिराम, आदी राहणार आहे.

## ११ विद्यार्थिनींच्या मृत्यूप्रकरणी अभियंत्यांना मोठा दिलासा

# सदोष मनुष्यवधाचा गुन्हा रद्द, केवळ निष्काळजीपणासाठी खटला चालणार

**जालना - प्रतिनिधी**

गुजरातमध्ये २००७ साली सरकारी मुलींच्या वसतिगृहातील जिना कोसळून ११ विद्यार्थिनींच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी, गुजरात उच्च न्यायालयाने चार अभियंत्यांना सदोष मनुष्यवधाच्या गंभीर आरोपातून मुक्त केले आहे. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३०४ अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला उद्देश किंवा ज्ञान आरोपी अभियंत्यांकडे नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. तथापि, बांधकामात निष्काळजीपणा दाखवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल कलम ३०४-अ अंतर्गत त्यांच्यावर खटला चालवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. या निकालामुळे फौजदारी कायद्यातील उद्देश आणि निष्काळजीपणा यातील सूक्ष्म फरक पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. ही घटना २६ जानेवारी २००७ रोजी घडली होती, जेव्हा सरकारी मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचा जिना कोसळून ११ मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला होता आणि अनेक जणी जखमी झाल्या होत्या. या प्रकरणी, संबंधित अभियंत्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ (सदोष मनुष्यवध), ३३७ (जीव धोक्यात आणणाऱ्या कृत्यामुळे दुखापत करणे), ३३८ (जीव धोक्यात आणणाऱ्या कृत्यामुळे गंभीर दुखापत करणे) आणि ११४ (गुन्हा घडताना मदत करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सत्र न्यायालयाने आरोप निश्चित केल्यानंतर आरोपींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हसमुख डी. सुथार यांनी आपल्या आदेशात नमूद केले की, अपघाताच्या प्रकरणांमध्ये आरोपीच्या निष्काळजीपणाचा थेट अंदाज लावता येत नाही. कलम ३०४ अंतर्गत गुन्हा तेव्हाच सिद्ध होतो, जेव्हा मृत्यू घडवून आणण्याचा उद्देश किंवा तसे कृत्य केल्यास मृत्यू होऊ शकतो याचे ज्ञान आरोपीला असते.

या प्रकरणात, तपासादरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांनुसार, आरोपींनी बांधकामाच्या वेळी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले, देखरेखीचा अभाव होता आणि लोड-बेअरिंग डिझाइनला सक्षम अधिकाऱ्याकडून मंजुरी घेतली नव्हती. वसतिगृहाच्या प्राचार्यांनी ३० डिसेंबर २००६ रोजी जिना दुरुस्तीसाठी पत्र देऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. न्यायालयाने पुढे म्हटले की, ''जरी फिर्यादी पक्षाचे सर्व आरोप खरे मानले, तरी हे सर्व निष्काळजीपणा या सदरात मोडते. आरोपींचा विद्यार्थिनींचा मृत्यू घडवण्याचा कोणताही उद्देश होता किंवा त्यांच्या कृतीमुळे जिना कोसळून मृत्यू होऊ शकतो, असे निश्चित ज्ञान त्यांना होते, हे सिद्ध होत नाही.

संपूर्ण इमारत आजही उभी आहे आणि केवळ जिना कोसळला आहे, यावरून हे स्पष्ट होते की हा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नसून निष्काळजीपणाचा प्रकार आहे.'' त्यामुळे, न्यायालयाने आरोपींना कलम ३०४ मधून दोषमुक्त केले, परंतु कलम ३०४-अ, ३३७, ३३८ आणि ११४ अंतर्गत खटला चालवण्यास परवानगी दिली. या निकालावर भाष्य करताना, नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष अॅड. महेश धन्नावत म्हणाले, ''गुजरात उच्च न्यायालयाचा हा निकाल फौजदारी कायद्याच्या मूलभूत तत्त्वांना बळकटी देणारा आहे. कोणताही गंभीर गुन्हा, विशेषतः सदोष मनुष्यवधासारखा गुन्हा सिद्ध करण्यासाठी गुन्हेगारी उद्देश हा सर्वात महत्त्वाचा घटक असतो. केवळ निष्काळजीपणामुळे घडलेल्या दुर्घटनेला आणि हेतुपुरस्सर केलेल्या गुन्ह्याला एकाच मापात तोलता येत नाही. या प्रकरणात, अभियंत्यांचा हलगर्जीपणा उघड झाला आहे, परंतु त्यांचा उद्देश मृत्यू घडवण्याचा नव्हता, हे न्यायालयाने अचूकपणे ओळखले. त्यामुळेच कलम ३०४ रद्द करून कलम ३०४-अ अंतर्गत खटला चालवण्याचा निर्णय कायद्याच्या दृष्टीने अत्यंत योग्य आणि महत्त्वपूर्ण आहे.''

आरोपी अभियंत्यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला होता की, घटनेच्या वेळी ते संबंधित ठिकाणी कार्यरत नव्हते आणि बांधकामात कोणताही हलगर्जीपणा झाला नव्हता. २००१ च्या भूकंपातही इमारत टिकून राहिली होती, याचा अर्थ बांधकाम निकृष्ट दर्जाचे नव्हते. याउलट, सरकारी पक्षाने गुजरात अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या अहवालाचा हवाला देत म्हटले की, बांधकामात वापरलेले काँक्रीट, स्टील, सिमेंट आणि विटा निकृष्ट दर्जाचे असल्याचे सिद्ध झाले आहे. अखेरीस, न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, अभियंत्यांना सदोष मनुष्यवधाच्या गंभीर आरोपातून मोठा दिलासा दिला. तथापि, त्यांच्या निष्काळजीपणामुळे ११ निष्पाप मुलींना आपला जीव गमवावा लागला, याबद्दलचा खटला आता सत्र न्यायालयात कलम ३०४-अ अंतर्गत चालवला जाईल, ज्यामुळे पीडित कुटुंबांच्या न्यायाच्या आशा अद्याप कायम आहेत.

# होळकर घराण्याच्या तत्त्वज्ञानी राणी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१वा जन्म उत्सव साजरा होत आहे. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर ह्या मराठा साम्राज्यातील एक अत्यंत कर्तबगार, न्यायप्रिय व प्रजाहितदक्ष, राणी होत्या. माळवा प्रांतावर यशस्वीपणे राज्य करत त्यांनी आपल्या कार्यकाळात अभूतपूर्व समाज सुधारणा केली. त्याचबरोबर मंदिराचा जीर्णोद्धार केला, प्रशासन कारभार कसा पद्धतीने चालावा याचा उत्तम नमुना त्या काळात राज्यकर्त्यांसमोर ठेवला. दानधर्म कसा करावा समाज हितदक्ष कसं राहावं याची चुणूक त्या काळात त्यांनी दाखवली. ३१ मे १७२५ हा त्यांचा जन्मदिवस. संपूर्ण भारत वर्षामध्ये त्यांचा जन्मदिवस साजरा केला जातो. त्यांनी आपल्या कार्यात प्रशासन व्यवस्था, न्यायव्यवस्था, व्यापार, उद्योग, धार्मिक कार्य, लोककल्याणकारी कार्य, स्त्रियांचे रक्षण,. यावर विशेष भर दिला.

त्यांनी २९ वर्ष राज्यकारभार सांभाळताना या सर्व गोष्टींचा विचार केला, म्हणून त्यांना लोकमाता, राजमाता, पुण्यश्लोक, आधी आदर युक्त उपाधींनी आदरांजली वाहिल्या जाते. ज्या मनगटात बळ, बुद्धी, आणि चातुर्य आहे , तोच स्वकर्तुत्वावर लोकाभुमीक राजा होऊ शकतो हा संदेश पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी दिला. ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केल्या जातो त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना विशेष आदरांजली वाहिल्या जाते. त्यांनी समाजासाठी व राज्य करत असताना लोकांसाठी, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीतीचा बिमोड, मुल दत्तक वारसा हक्क, प्रजेविषयी तळमळ, यावं अशा अनेक समाज सुधारणांच्या कृतिशील कार्य केले आहे. ज्या काळात सतीश आणि ही प्रथा होती, त्या काळात त्यांनी पती खंडेराव यांना वीरमरण आले त्यानंतर हा पुरोगामी विचार रुजविला. या पुरोगामी विचारांमध्ये धर्म रूढी परंपरा या पलीकडे जाऊन कार्य करण्यासाठी जनतेच्या सेवेसाठी आपण आहोत ही भावना त्यांनी स्वतःच्या मनामध्ये रुजविली. पती त्यानंतर सासरे दुःखाला कवटाळण्यापेक्षा दुःखाला सामोरे जाऊन समाज हितदक्ष कार्य करणे हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून कार्य केले. अहिल्यादेवी होळकर आणि धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता,बंधुता,आणि न्याय या तत्त्वज्ञानाप्रमाणे कार्य केले. म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक तत्त्वज्ञानी राणी होत्या, असा इतिहास सांगतो.

मल्हाररावाच्या मृत्यूनंतर मल्हारवांच्या मृत्यूनंतर आपली राजधानी इंदूर वरून महेश्वर या ठिकाणी नेली. त्या मजूर, कारागीर, विणकर, कलावंत, साहित्यिक, यांच्या विकासासाठी जमीन घर पैसा उपलब्ध करून दिला. जनावरांसाठी कुरणे राखीव ठेवली.

सर्वधर्मसमभावाच्या आदर्शासाठी त्यांनी मंदिरे, मशिदी, दर्गे,व विहार बांधली. अनेक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. त्याचबरोबर पर्यटनाला चालना मिळण्यासाठी त्यांनी महारस्ते बांधली.



मजुरांना काम मिळावे व सर्व धर्मातील लोक एकोप्याने राहावे यासाठी कार्य केले. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे यांच्यासोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा विवाह करून दिला. यातून अहिल्यादेवी चे सामाजिक भान दिसून येते. त्यांनी एकच धर्म आपल्या पूर्ण कारकिर्दीमध्ये पाळला तो म्हणजे मानवता धर्म, अंधश्रद्धेच्या पाठी आंधळेपणानं जाता डोळसपणे विचार करून अंधश्रद्धा बाजूला सारल्या. खाजगी उत्पादनाचा विचार हा लोककल्याणकारी उपयोगासाठी आणला. म्हणूनच त्या लोकमाता राष्ट्रमाता झाल्या.

मल्हार होळकर आणि त्यांना प्रशासकीय कारभार, सैन्याच्या कामामध्ये पारंगत केलेले होते. मल्हारराव होळकरांच्या एक कर्तबगार सुन म्हणून त्यापुढे येत असतानाच त्यांचे पती खंडेराव यांना वीरमरण आल्यानंतर मल्हार होळकरांकडे नेतृत्व होते परंतु मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर संपूर्ण माळवा प्रांताची जबाबदारी अहिल्यादेवी होळकर यांच्या खांद्यावर येऊन पडली. मल्हारराव होळकरांकडून राज्यकारभाराचे धडे मिळालेले असल्यामुळे, त्यापुढे राज्यकारभार पाहू लागल्या. या सैन्याचे ही नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांना सेनापाती म्हणून नेमले.

अहिल्यादेवी यांनी सामाजिक भान ठेवत त्या पद्धती कधीच पाळली नाही. त्या नेहमीसाठी राज्य कारभार करत असताना जनता दरबार भरवीत असे, आपण जनतेचा सेवेसाठी आहोत हा भाव त्या नेहमी पाळत असत. जनतेची कार आणि ऐकण्याचा त्यांचा प्रघात होता. धन्यवाद रस्ते विकास, किल्ले बांधणे त्यांचा विकास करणे, मराठीमध्ये उत्सव भरवणे एक काम ते नेहमी करत असत. हिंदू मंदिरांमध्ये पूजा आरत्या सुरू राहावी यासाठी त्यांचा कटाक्ष असे.

माळवा प्रांताच्या बाहेरही त्यांनी अन्य प्रांतांमध्ये धर्मशाळा, विहिरी, घाट, मंदिरांचा जिर्णोद्धार सामाजिक व धार्मिक कामे केलेली आहे.

अहिल्यादेवी नी जनतेच्या व रयतेच्या कल्याणासाठी अनेक कामे केलेली आहे. महेश्वर येथील राजधानी अहिल्यादेवीची जणू काही संगीत काव्य साहित्य व उद्योग यांची एक संस्था होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी मोरोपंत व शाहीर आनंद फंदी यांना व साईराम यांना अहिल्याबाईनीआश्रय दिला होता. अहिल्याबाईंच्या राज्यकारभारात कामगारांना,कारागिरांना, मूर्तिकारांना वेतन मिळत असे.

१९ व्या, विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी, व अमेरिकन इतिहासकार हे मानतात आजही भारतात अहिल्यादेवी यांना संतांचा सन्मान मिळतो.

अहिल्यादेवी चा इतिहास त्यांनी राजकारणातील बारकावे,तत्व,नीती, नियम, सूत्रे तसेच या देशाची भौगोलिक स्थिती, सामाजिक व राजकीय स्थिती, रणांगणातील आखाडे व बारकावे व्यवस्थित समजावून घेऊन राज्यकारभार केला, म्हणूनच त्यांना एक तत्त्वज्ञानी राणी असे म्हटले जाते.

अहिल्यादेवी समाज सुधारणा बरोबरच न्याय सुधारणा करताना आपल्या सैन्यांमध्ये पुरुषाप्रमाणेच महिलांचाही सैन्यात समावेश करून स्त्री पुरुष समानता व न्यायवादी भूमिका केल्यामुळे, न्याय देवता म्हणून सुद्धा अहिल्यादेवींना ओळखल्या जाते. शेतकरी सुखी तर जग सुखी, ही संकल्पना राबवताना त्यांनी आपल्या राज्यामध्ये विहिरी बांधल्या, शेतकऱ्यांची जाचक करातून मुक्तता केली, गोपालनाचे महत्त्व समजावून मोठ्या प्रमाणावर गोपालन घडून आणले.

अनेक विद्वान लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांना भेटण्यासाठी येत असेल त्यांच्याशी चर्चा करीत असत आणि भेट झाल्यानंतर ते त्याच ठिकाणी राहत असत, अनेक विषयांचे विद्वान व्याकरणकार, शास्त्री, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य,हकीम, यांचा समावेश असे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील महाराष्ट्रातील मंदिरे, घाट, वाडे, धर्मशाळा व इतर कामे यांची माहिती आपल्याला पुढील प्रमाणे देता येते, चांदवड चा रंग महाल, खडकी पिंपळगाव चा होळकर वाडा, काठापुर चा वाघ वाडा, पंढरपूरचा होळकर वाडा, लासलगाव चा अहिल्यादेवी चा किल्ला, पळशीचा पळशीकर वाडा, अकोले तालुक्यातील विहिरी उदाहरणार्थ वाशेरे विरगाव, वीरगाव ची बारव, ओझर येथे दोन विहिरी व एक कुंड, कोल्हापूर येथे मंदिर पूजेसाठी सहाय्य, घृष्णेश्वर येथे शिवालय तीर्थ, चांदवड वाफेगाव येथे रेणुका मातेचे मंदिर, पंचवटी नाशिक येथे राम मंदिर,गोरा महादेव मंदिर, विघ्नेश्वर मंदिर धर्मशाळा आणि रामघाट, पंढरपूर येथे राम मंदिर तुळशीबाग होळकर वाडा सभा मंडप, धर्मशाळा व बाजीराव विहीर, भीमाशंकर येथे गरीबखाना, जेजुरी येथे मल्हार गौतमेश्वर, विठ्ठल, मार्तंड मंदिरे, जनाई महादेव व मल्हार नावाचे तलाव, जळगाव येथे राम मंदिर, बीड येथे घाटाचा जिर्णोद्धार, संगमनेर येथे राम मंदिर, साखरगाव येथे विहीर, समनापुर येथे पुरातन बारव, पुणतांबा येथे गोदावरी नदीवर घाट, सप्तशृंगी येथे धर्मशाळा चौंडी येथे चौंडेश्वरी मंदिर,सिनेश्वर महादेव मंदिर, धर्मशाळा व घाट, आधी दानधर्मातून व पुण्यकर्मातून केलेली ही सर्व कामे आहे. यातून अहिल्यादेवींचा दानशूरत्वचा भाव लक्षात घेऊन अहिल्यादेवींचे धातृत्व लक्षात येते. अहिल्यादेवी बद्दल म्हणावेसे वाटते की दूरदृष्टी ठेवून एका स्त्रीने केलेला राज्यकारभार, व लोक कल्याणकारी राजाची निर्मिती असते हे दाखवून देण्याचा काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केलेले आहे. म्हणूनच एक तत्त्वज्ञानी राणी , म्हणून अहिल्यादेवींचा उल्लेख करावासा वाटतो.

**प्राध्यापक - दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, प्रांत उपाध्यक्ष, वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र, सचिव शिवराम पाटील प्रतिष्ठान टेंभुर्णी, तालुका जाफराबाद जिल्हा जालना**

**चित्रः- चित्रकार संतोष बाबुराव आवटी**

### मराठवाड्यात शिवसेनेचा नवा चेहरा पुढे येणार?

# छत्रपती संभाजीनगर-जालना किंवा परभणी-हिंगोली मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी डॉ. संजय लाखे पाटील यांची जोरदार दावेदारी

**जालना -प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून शिवसेनेचे सचिव तथा सहमुख्य संपर्क प्रमुख (मराठवाडा) डॉ. संजय लाखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर-जालना किंवा परभणी-हिंगोली या मतदारसंघांपैकी कोणत्याही मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रही मागणी करणार असल्याची माहिती समोर आली आहे. मराठवाड्यात गेल्या अनेक वर्षांपासून संघटनात्मक पातळीवर सातत्याने काम करणारे नेतृत्व म्हणून डॉ. लाखे पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे. पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांना बळ देणे, विविध सामाजिक प्रश्नांवर भूमिका मांडणे आणि जनसंपर्क वाढविणे या माध्यमातून त्यांनी मराठवाड्यात स्वतंत्र राजकीय स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांना संधी देण्याची मागणी कार्यकर्त्यांमधून जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे छत्रपती संभाजीनगर-जालना तसेच परभणी-हिंगोली हे दोन्ही मतदारसंघ शिवसेनेचे पारंपरिक बालेकिल्ले म्हणून ओळखले जातात. या मतदारसंघांत शिवसेनेची मजबूत संघटनात्मक ताकद



असून पक्षाशी निष्ठावान असलेला मोठा मतदारवर्ग आहे. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये उमेदवारी मिळविण्यासाठी अनेक इच्छुक प्रयत्नशील असले तरी डॉ. संजय लाखे पाटील यांचे नाव सध्या सर्वाधिक चर्चेत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पक्षविस्तारासाठी त्यांनी केलेले काम, युवकांमधील लोकप्रियता आणि पक्षश्रेष्ठींशी असलेला समन्वय यामुळे त्यांची दावेदारी अधिक मजबूत मानली जात आहे. शिवसेनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी देखील पक्ष नेतृत्वाकडे डॉ. लाखे पाटील यांना उमेदवारी देण्याची मागणी केली असल्याची माहिती आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील प्रभावी आणि संघटनक्षम नेतृत्वाला संधी देण्याबाबत पक्ष नेतृत्व सकारात्मक विचार करू शकते, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू आहे. दरम्यान, डॉ. संजय लाखे पाटील यांच्यावर पक्षाने जबाबदारी दिल्यास ती पूर्ण ताकदीने पार पाडण्याची तयारी असल्याचे सांगण्यात आले आहे.

त्यामुळे छत्रपती संभाजीनगर-जालना किंवा परभणी-हिंगोली या मतदारसंघांमधून शिवसेनेचा उमेदवार म्हणून त्यांचे नाव जाहीर होते का, याकडे आता संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत पक्षश्रेष्ठींकडून उमेदवारीबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता असून, डॉ. संजय लाखे पाटील यांच्या दावेदारीमुळे मराठवाड्यातील राजकीय चर्चांना नवे उधाण आले आहे.

# जालन्यातून चोरीला गेलेला टाटा ट्रक अवघ्या दोन तासांत शोधला

### स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, दोन आरोपी जेरबंद

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहरातून चोरीला गेलेला १२ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा ट्रक अवघ्या दोन तासांत शोधून काढत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) दोन आरोपींना अटक केली आहे. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे करण्यात आलेल्या या जलद कारवाईमुळे जालना पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पुणे जिल्ह्यातील धायरी येथील रहिवासी तथा ट्रान्सपोर्ट व्यावसायिक रविंद्र नामदेव धनावडे (वय ४७) यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या मालकीचा टाटा ट्रक (क्र. -११--३५७७) हा



दिनांक २९ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास जालना शहरातील हिरो होंडा शोरूमच्या मागील बाजूस असलेल्या मंगलमूर्ती ट्रान्सपोर्ट परिसरातून अज्ञात चोरट्यांनी लंपास केला होता.

या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

**पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनंतर तपासाला वेग**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने *(पान २ वर)*

## ब्रम्हज्ञान हेच मोक्षाला कारण असून भक्ती ज्ञानाची जननी आहे -डॉ प्रमोद महाराज कुमावत

**दत्ता देशमुख**

आपल्या दु:खाला कारण शरीर आहे. शरीराला कारण पापपुण्य आहे. पापपुण्याला कारण अनुकूल प्रतिकूल ज्ञान आहे . याला कारण राग द्वेष आहे. राग द्वेषाला कारण भेद ज्ञान आहे, भेदाला कारण स्वस्वरूपाचे अज्ञान आहे. अज्ञान घालविण्यासाठी भक्ती श्रेष्ठ आहे.भक्ती हीच ज्ञान वैराग्याची जननी आहे असे प्रतिपादन डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले आहे.

सिडको एन सहा येथील विठ्ठल मंदिरामध्ये आयोजित श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरू आहे त्यात ते बोलत होते. मन व इंद्रिये वासनारूप विषाने भरू देऊ नका.मन व इंद्रिये बिघडू नये म्हणून त्यांना सत्संगामध्ये ठेवले



पाहिजे. सत्संगामध्ये मन इंद्रिये पुष्ट होतील. शुध्द सत्त्वगुण निर्माण होईल व त्यात ज्ञान निर्माण होईल त्यानेच कल्याण होईल.

अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या या सोहळ्याचा ३१ मे पर्यंत सुरू आहे.१ जुन रोजी सकाळी १० ते १२ हभप कृष्णा महाराज आरगडे यांचे काल्याचे कीर्तनाने सोहळ्याचा समारोप होणार आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# श्रीमद् भगवद्गीतेचा मुख्य विषय युद्ध नसून ब्रह्मविद्या- ॲड. चिदंबरेश्वर महाराज साखरे

### जालन्यात श्रीमद्भगवद्गीता ज्ञानयज्ञाला उत्साहात सुरुवात

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनिधी) - भगवद्गीतेचा मुख्य विषय युद्ध नाही, तर ब्रह्मविद्या आहे. सामान्यतः जनतेला वाटते की भगवंताने अर्जुनाला रणांगणावर युद्ध करायला सांगितले, त्यामुळे गीतेचा विषय युद्ध असावा. परंतु, प्रत्येक अध्यायाच्या समाप्तीनंतर आपण ब्रह्मविद्यायाम् असे म्हणतो. त्यामुळे भगवद्गीतेचा खरा विषय युद्ध नसून ब्रह्मविद्या हाच आहे, असा हितोपदेश आळंदी देवाची येथील प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. गुरुवर्य ॲड. चिदंबरेश्वर किसन महाराज साखरे यांनी येथे बोलताना केला.





श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सत्संग मंडळ आणि येथील जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात २९ ते ३१ मे दरम्यान सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत आयोजित तीन दिवसीय भव्य श्रीमद्भगवद्गीता ज्ञानयज्ञाला शुक्रवारी उत्साहात सुरुवात झाली. ल गुरुवर्य ॲड. चिदंबरेश्वर किसनमहाराज साखरे हे मुख्य अक्षरब्रह्मयोग (अध्याय ९ वा - राजविद्याराजगुह्ययोग) या विषयावर तीन दिवस अमृतवाणीतून मार्गदर्शन करणार आहेत. ज्ञानयज्ञाच्या पहिल्या दिवशी प्रवचन सेवा रुजू करताना ॲड. चिदंबरेश्वर महाराजांनी भगवद्गीतेतील मर्म आणि मानवी जीवनातील त्याचे महत्त्व यावर अत्यंत अभ्यासपूर्ण निरूपण केले. ब्रह्मविद्येचा मानवी कर्तव्यात उपयोग यावर निरूपण करताना युद्धाच्या प्रसंगी ब्रह्मविद्येची काय गरज? असा प्रश्न उपस्थित करत महाराजांनी स्पष्ट केले की, ब्रह्मविद्या किंवा ब्रह्मज्ञान प्राप्त झालेला मनुष्य आपल्या कर्तव्यामध्ये कधीही कसूर करत नाही. तो कोणतीही क्रिया अत्यंत बोधपूर्वक करतो. भगवंताने अर्जुनाला केवळ युद्ध कर असे म्हटले नाही, तर तू तुझे कर्तव्य कर असा उपदेश केला आणि अर्जुनाचे त्यावेळचे कर्तव्य युद्ध करणे हेच होते. आपल्याला रोज तलवारी घेऊन लढायचे नसले तरी जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या वचनानुसार, आपल्या मनात रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग सुरूच असतो. हे युद्ध आपल्या मनातील संशयाविरुद्ध असते. संशय हे सर्वात मोठे पाप आहे आणि ज्ञानपूर्वक केलेला व्यवहारच माणसाला संशयातून आणि संकटातून तारून नेतो. महाराजांनी आपल्या निरूपणात गुरुशरणतेचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, जर आपण गुरूंना शरण गेलो, तर कोणत्याही कठीण प्रसंगातून उत्तीर्ण होण्याचे सामर्थ्य त्या गुरुकृपेमध्ये असते. जसा साधकाचा अधिकार आणि विवेक वाढत जातो, तशी त्याला ज्ञानप्राप्ती होते. ज्ञानप्राप्तीसाठी योग, कर्म, उपासना आणि नामभक्ती यासोबतच आपल्या परंपरेने सांगितलेला गुरुभक्तीचा मार्ग हा अत्यंत विशेष आहे. भारतीय तत्त्वज्ञानावर बोलताना त्यांनी आवर्जून सांगितले की, जगात जेवढी विज्ञाननिष्ठा आपल्या धर्मात आणि तत्त्वज्ञानात आहे, तेवढी इतर कुठेही नाही. विज्ञानाचा हेतू सत्य शोधणे हा आहे, तर अध्यात्माला *(पान २ वर)*

# ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी क्रीडा साहित्याचे वाटप

**परतुर - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील उसतोड कामगार व स्थलांतरित कुटुंबातील मुले, किशोरवयीन व एकल महिलांसाठी खेळ आणि पोषणाचा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने मकरसंक्रांत निमित्त उपक्रम राबविण्यात आलेल्या उप क्रमाला लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उपक्रमात खेळाच्या माध्यमातून संतुलित आहार, पोषक तत्त्वांची ओळख, जंक फूडचे दुष्परिणाम व घरगुती सकस आहाराचे महत्त्व याबाबत



माहिती देण्यात आली. पोषण थाळी जुळवा खेळ, प्रश्नोत्तरी, चित्रांद्वारे ओळख खेळ, भूमिका नाट्य आदी उपक्रमांमुळे सहभागी मुलांनी आनंदात पोषणाचे धडे घेतले. तसेच गावात पाणी व पाणी पुरवठा कामाचे नियोजण करूण प्रत्येक कुटुंबाला पाणी मिळेल या साठी काम करणे व महिला पुरूष कामासाठी मदत करणे कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शक प्रकल्प व्यवस्थापक, राहुल गाढवे. संदीप जाधव. विकास काबळे. समुदाय संघटक, एकनाथ राउत.जिल्हा समन्वयक जालना,

लहान मुलांचे पोषण, गर्भवती व स्तनदा मातांचा आहार, तसेच किशोरवयीन मुला-मुलींसाठी आवश्यक पोषण यावर मार्गदर्शन केले. सहभागी महिलांनी दैनंदिन आहारात बदल करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या खेळ पोषणाच्या विविध माध्यामातुन खेळ गाणे च्या माध्यामातुन उपक्रम घेण्यात आला तसेच विजेता महिलांना बक्षीस देण्यात हीआले. पोषणाबाबत जागृती वाढवून कुपोषण प्रतिबंधास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कर्मचारी,दुर्गा नाडे. शितल पराडे. अम्रपाली साळवे. मंगल झोडपे.आशा सेविका व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# बौद्धाचार्य श्रामनेर शिबिर!

**दत्ता देशमुख**

तक्षशिला बुद्ध विहार समर्थ नगर येथे २९ मे पासून ७ जून २०२६पर्यंत तक्षशिला बुद्ध विहारामध्ये भारतीय बौद्ध महासभेतर्फे भव्य श्रामनेर शिबिराचे आयोजन केलेले आहे.शिबिरामध्ये

एकूण ३० श्रामनेर यांनी श्रामनेर म्हणून १० दिवसासाठी दीक्षा घेतली आहे. या शिबिरामध्ये श्रामनेरांना धम्माची शिकवण, त्रिशरण पंचशील, बुद्ध धम्म संघ संस्कारमय शिकवण दिली जाणार आहे. थेरो भदंत शिवली मुख्य मार्गदर्शक तर रवींद्र दारोकार (अमरावती) तक्षशिला बुद्धविहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे तसेच अशोक गंगावणे, चंद्रकांत वाघमारे, बगळे सर , संभाजी कांबळे, चंद्रकांत वाघमारे डॉ.सुशील सूर्यवंशी ( रिपब्लिकन सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ) डॉ . राजकुमार म्हस्के,संदीपभाऊ खरात, नगरसेविका



रीमाताई खरात यांचे विशेष मार्गदर्शन लाभले .

यावेळी महिला जिल्हाध्यक्ष आशा कोळी, राजेश सदावर्ते भारतीय बौद्ध महासभा ( जिल्हाध्यक्ष जालना), माधवराव पात्रे( सरचिटणीस भारतीय बौद्ध महासभा), अरुण वाघमारे (कोषाध्यक्ष) कुणाल दहिवले( उपाध्यक्ष) , उपाध्यक्ष सुभाष म्हस्के, प्रकाश राऊत, समाधान खरात सचिव संरक्षण, गणपत भद्रे पर्यटन सचिव, शेषराव सोनवणे संघटक कुलदीप गरड सचिव,उपस्थित होते. यावेळी सर्व उपासक व उपासिका धम्मदानासाठी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात सहायक पोलीस निरीक्षकांच्या प्रशासकीय बदल्या; जालन्यात नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती

**जालना | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रातील निःशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या () प्रशासकीय बदल्यांचे आदेश विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी शुक्रवारी (दि. २९ मे) जारी केले. कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी ठेवणे, रिक्त पदे भरणे आणि प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन या बदल्या करण्यात आल्या आहेत. परिक्षेत्रीय पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जालना, बीड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर ग्रामीण या घटकांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ तसेच महाराष्ट्र अध्यादेश क्र. २४ (२०१४) मधील तरतुदींनुसार परिक्षेत्रीय पोलीस आस्थापना मंडळाला प्राप्त अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे. जालना जिल्ह्यात चार एपीआयंची नियुक्ती बदल्यानुसार बीड जिल्ह्यात कार्यरत असलेले महेंद्रसिंग सुरेंद्रसिंग ठाकुर, भार्गव सुदाम सपकाळ आणि संतोष तेजराव जंजाळ यांची जालना येथे बदली करण्यात आली आहे. तसेच यापूर्वी जालना येथे कार्यरत असलेल्या वैशाली मदन पवार यांना एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे.

दरम्यान, जालना जिल्ह्यातील योगेश गोकुळ धोंडे यांची बदली छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे करण्यात आली आहे.

**अनेक अधिकाऱ्यांना मुदतवाढ**

या आदेशात धाराशिव व बीड जिल्ह्यातील काही अधिकाऱ्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामध्ये शंकर मधुकर सुर्वे, पिराजी रामजी तायवाडे, सुदर्शन भारत कासार, भरत उत्तम मोरे, वैशाली मदन पवार, चंद्रकांत गोविंद गोसावी, रत्नाकर मधुकर घोळवे, श्रीकांत सुदामराव भराटे, शशिकांत लक्ष्मण तवार आणि विठ्ठल दिनकर चासकर यांचा समावेश आहे.

**तात्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश**

बदली झालेल्या अधिकाऱ्यांना पर्यायी अधिकारी येण्याची वाट न पाहता तात्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्याची माहिती तातडीने परिक्षेत्र कार्यालयाला सादर करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रिया किंवा आचारसंहिता लागू असलेल्या ठिकाणी संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून नियमांचे पालन करत बदलीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देशही आदेशात देण्यात आले आहेत.

**निलंबन किंवा रुग्णनिवेदनाबाबत विशेष सूचना**

बदली आदेशानंतर एखादा अधिकारी निलंबित झाल्यास त्याला बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल परिक्षेत्र कार्यालयास पाठविण्याचे निर्देश आहेत. तसेच बदलीनंतर रुग्णनिवेदन करणारे अथवा गैरहजर राहणारे अधिकारी यांनाही संबंधित तारखेपासून कार्यमुक्त करण्यात यावे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**जालन्यातील बदल्यांची यादी**

अधिकारी सध्याचे ठिकाण
नवीन नियुक्ती
महेंद्रसिंग सुरेंद्रसिंग ठाकुर
बीड जालना भार्गव सुदाम
सपकाळ बीड जालना
संतोष तेजराव जंजाळ
बीड जालना
वैशाली मदन पवार जालना १
वर्ष मुदतवाढ योगेश गोकुळ धोंडे
जालना छत्रपती संभाजीनगर
ग्रामीण

या बदल्यांमुळे जालना जिल्हा पोलीस दलात काही नव्या अधिकाऱ्यांची एन्ट्री होणार असून कायदा व सुव्यवस्था व्यवस्थापनात त्याचा सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.